# रेडिओचे दिवस

" मी यौवन बिजली, पाहून थिजली, इंद्रसभा भवताली..." बेला शेंडे ठसक्यात गात होती. गाणं संपलं आणि मी अनाऊन्स केलं," यू वेअर लिसनिंग टू अ सॉंग फ्रॉम अ मराठी मूव्ही नेम्ड नटरंग. इट वॉज संग बाय बेला शेंडे ॲंड कम्पोज्ड बाय अजय अतुल". इतक्यात रेडिओ स्टेशनमधला फोन खणखणला," ग्रेट म्युझिक मॅन! इट साऊण्ड्स सो रिच! आय हॅवण्ट हर्ड एनिथिंग लाईक धिस बिफोर!..." एक अमेरिकन 'अप्सरा आली' चं बेफाट कौतुक करत होता. त्याला मराठी नावाची भाषा भारताच्या कुठल्या भागात बोलली जाते, लावणी हा काय प्रकार असतो, याबद्दल ओ की ठो माहित नव्हतं, पण हे गाणं त्याच्या मनाला भिडलं होतं! त्याला थोडक्यात माहिती सांगितली आणि फोन बंद केला. भाषा, संस्कृती, देश यांच्या सीमा पार करणारं संगीत बनवणाऱ्या 'नटरंग'च्या टीमला मनात म्हणलं, "तुस्सी ग्रेट हो!"

मागच्या जुलै महिन्यात मी अमेरिकेतल्या 'फिलाडेल्फिया' या पूर्व किनाऱ्यावरच्या शहरातून 'मिडवेस्ट' मधल्या 'केंटकी' राज्यातल्या 'लेक्झिंग्टन' नावाच्या शहरात नोकरीसाठी 'मूव्ह' झालो. फिलाडेल्फिया हे बरंच मोठं, गजबजलेलं शहर. सर्व देशांच्या, वर्णांच्या, भाषांच्या लोकांची सरमिसळ झालेलं. त्यामानानं लेक्झिंग्टन बरंच लहान. इथले लोक आणि समाजसुद्धा अधिक बंदिस्त. त्यात नुकताच रहायला आलेलो, त्यामुळं कोणी मित्रमैत्रिणीसुद्धा नव्हते. त्यामुळं पहिले काही महिने जाम कंटाळा यायचा. मोकळा वेळ खायला उठायचा. पण मग वाटलं की या मोकळ्या वेळाचा उपयोग बाकीचे छंद जोपासायला का करू नये? रेडिओचं लहानपणापासून आकर्षण होतं. भारतीय संगीत, विशेषत: हिंदी-मराठी चित्रपट संगीत, ही तर मर्मबंधातली ठेव. घरी वडिलांकडे जुनी चित्रपट गीते, गझल्स यांचा मोठा साठा होता. लहानपणी ओळख झालेल्या लता, रफी, आशा, मन्ना डे, किशोर, गुलाम अली, जगजीत सिंग या मंडळींनी अजूनही पाठ सोडलेली नाही. वाटलं की भारतीय संगीतावर आधारित असा एखादा कार्यक्रम अमेरिकन

रेडिओ–स्टेशनवर करायला मिळाला तर किती मजा येईल! पण मी नोकरी सांभाळून, फावल्या वेळात हे काम करणार. त्यामुळे कमर्शियल रेडिओ स्टेशन्सवर चौकशी करून काही फायदा नव्हता. पण 'गूगल' केल्यावर अशी माहिती मिळाली की 'युनिव्हर्सिटी ऑफ केंटकी' चं एक रेडिओ स्टेशन आहे. अमेरिकेतला 'कॉलेज रेडिओ' हा प्रकार नवीन नव्हता, पण हे ' ना नफा ना तोटा' तत्वावर संपूर्णपणे व्हॉलंटियर्सनी चालवलेलं स्टेशन आहे, इथे काम करण्यासाठी युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी किंवा कर्मचारी असलंच पाहिजे अशी अट नाही आणि हे अमेरिकेतल्या अतिशय चांगल्या कॉलेज रेडिओ स्टेशन्सपैकी एक म्हणून गणलं जातं, असं कळल्यावर विचार केला की इथे प्रयत्न करायला काय हरकत आहे?

मी जिथे काम करतो त्या कंपनीची रिसर्च लॅब युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमध्येच आहे. एके दिवशी त्या रेडिओ स्टेशनच्या ऑफिसमध्ये गेलो. तिथं बसलेल्या मुलीनं मला एक फॉर्म भरायला दिला. त्यात तुम्ही कोण, स्टेशनवर काम का करायचं आहे, कुठल्या प्रकारचं संगीत आवडतं वगैरे प्रश्न होते. तो भरून स्टेशनच्या ट्रेनिंग डायरेक्टरच्या मेलबॉक्समध्ये ठेवला. काही दिवसांनी तिच्याकडून एक इ–मेल आलं की ज्यांना स्टेशनवर 'व्हॉलंटियर डीजे' म्हणून काम करायचं आहे, त्यांच्यासाठी अमुक तारखेला ट्रेनिंग सेशन आहे तेव्हा तू ये. त्याप्रमाणं त्या दिवशी पुन्हा स्टेशनच्या ऑफिसमध्ये गेलो. युनिव्हर्सिटीच्या स्टुडंट सेंटरमध्ये या रेडिओ स्टेशनचं चार खोल्यांचं ऑफिस आहे. यातली एक खोली म्हणजे 'ऑन एअर' रुम– जिथून प्रोग्रॅम ब्रॉडकास्ट होतात. एक हॉल आणि अजून दोन छोट्या खोल्या. प्रत्येक खोलीमध्ये भिंतीला लागून शेल्फस आणि ती सीडीज, कॅसेटस आणि रेकॉर्डसनी खच्चून भरलेली. स्टेशनमध्ये एक बाथरूम पण आहे आणि तिच्या भिंती 'ग्राफिटी'नं ओतप्रोत भरलेल्या आहेत. यामध्ये विसर्जनक्रियेबद्दलच्या पांचट विनोदांपासून ते अगदी अमेरिकेच्या अध्यक्षांना सुनावलेल्या चार उपदेशपर शब्दांपर्यंत सगळे विषय येऊन गेलेत!

केटी डिक्सन नावाची हसतमुख मुलगी ट्रेनिंग डायरेक्टर होती. ती स्वतः

विद्यार्थीच आहे– अभ्यास सांभाळून स्टेशनवर प्रोग्रॅम करते आणि माझ्यासारख्या हौशी डीजेंना तयार पण करते. तिनं आम्हाला दोन–अडीच तासांचं ट्रेनिंग दिलं. १९८८ मध्ये काही विद्यार्थ्यांनीच पुढाकार घेऊन, पैसे जमवून, आवश्यक त्या मंजुऱ्या मिळवून सुरु केलेलं हे स्टेशन. स्टेशनचं नाव 'रेडिओ फ्री लेक्झिंग्टन'. बाकीच्या व्यावसायिक स्टेशन्समध्ये आणि 'रेडिओ फ्री लेक्झिंग्टन' मध्ये खूप फरक आहे. लोकांना कशाप्रकारचे कार्यक्रम आवडतात याचे 'डेमोग्राफिक सर्व्हे' घेऊन तसेच कार्यक्रम सादर करणं किंवा श्रोत्यांवर जाहिरातींचा सारखा मारा करणं असे प्रकार इथं अजिबात केले जात नाहीत. इथं काम करणाऱ्या प्रत्येक डीजेला काही माफक मर्यादा सोडता स्वतःला हवं ते संगीत वाजवण्याची आणि हवा तसा कार्यक्रम करण्याची संपूर्ण मुभा आहे. फक्त अट एकच– कार्यक्रम काहीतरी वेगळा, 'हट के' असला पाहिजे. एकूण दीडदोनशे लोक व्हॉलंटियर म्हणून रेडिओ स्टेशन चालवणारे– त्यामुळं स्टेशनवरच्या कार्यक्रमांमध्ये खूप जास्त विविधता आहे. अधिकृतरीत्या कुठंही लिहिलं नसलं तरी स्टेशनची विचारसरणी त्याच्या रेडिओ डायल वरच्या पोझिशनसारखीच डावीकडं झुकलेली. 'ऑल द वे टू द लेफ्ट' किंवा 'रिव्होल्यूशन्स डू नॉट हॅपन बिटवीन कमर्शियल ब्रेक्स' अशा त्यांच्या स्लोगन्ससुद्धा सूचक आहेत. शिवाय स्थानिक कला, संस्कृती यांची वाढ व्हावी म्हणून स्थानिक कलाकारांना संधी आणि प्रोत्साहन देणं हाही स्टेशनचा एक उद्देश आहे. एक प्राध्यापक स्टेशनच्या कारभारावर एकूण देखरेख करतात पण त्यांना मी कधी विशेष ढवळाढवळ करताना पाहिलं नाही. दिवसाचे चोवीस तास आणि आठवड्याचे सातही दिवस हे स्टेशन चालू असतं आणि सुमारे ५०,००० स्थानिक लोक दररोज हे स्टेशन ऐकतात. याशिवाय इंटरनेटवरून जगाच्या कानाकोपऱ्यात कोणीही या स्टेशनचे कार्यक्रम ऐकू शकतं.

ट्रेनिंगमध्ये आम्हाला 'ऑन एअर' रूममधली उपकरणं कशी वापरायची, दर तासानं स्टेशनचं नाव कोणत्या प्रकारे अनाऊन्स करायचं, जे संगीत वाजवतोय त्याची नोंद स्टेशनच्या वेबसाईटवर कशी करायची, वगैरे गोष्टींची माहिती मिळाली. याचबरोबर डीजेनं 'ऑन एअर' कोणते शब्द कधीही बोलायचे

नाहीत, 'प्रौढांसाठी' असलेलं संगीत कोणत्या विशिष्ट वेळेत लावायचं, हेपण सांगण्यात आलं. एखादा अश्लील शब्द क्रियापद असेल तर तो obscene आणि नाम असेल तर indecent ही त्यांची वर्गवारी मजेशीर होती. भारतीय संगीतावर आधारित कार्यक्रम करायचाय म्हटल्यावर केटीनं सांगितलं की वीणा बन्सल नावाच्या बाई मागची दहाबारा वर्षं 'म्युझिक फ्रॉम इंडिया' नावाचा कार्यक्रम करतायत. ती म्हणाली की नवीन कार्यक्रम चालू करण्याआधी त्यांना भेट, म्हणजे पुनरावृत्ती व्हायला नको.'म्युझिक फ्रॉम इंडिया' दर गुरुवारी रात्री ८ ते १० या वेळात असतो. मी पुढच्या गुरुवारी वीणाजींना भेटायला स्टेशनवर गेलो.

वीणाजी सुमारे पन्नाशीच्या आसपासच्या. अमेरिकेत तीसएक वर्षांपूर्वी आलेल्या. मुलं मोठी होवून लांब निघून गेली आणि कंटाळा यायला लागला म्हणून हा कार्यक्रम करायला लागल्या. मला नव्याजुन्या संगीताची आवड आहे म्हणल्यावर एकदम खूष झाल्या. त्यांना आजकाल दर गुरुवारी कार्यक्रम करणं जमत नव्हतं. त्यात त्या दोन महिन्यांसाठी भारतात चालल्या होत्या आणि त्यांच्या अनुपस्थितीत कार्यक्रम करायला त्यांना मनासारखा डीजे सापडत नव्हता. त्या म्हणाल्या, " मला जायला अजून दीड महिना आहे, तोवर आपण दोघं मिळून कार्यक्रम करत जाऊ, म्हणजे तू तयार होशील आणि मी सुीवर गेल्यावर एकट्यानं कार्यक्रम करू शकशील. मी परत आले की आपण दोघं आलटून–पालटून कार्यक्रम करत जाऊ." त्यांनी पुढच्याच गुरुवारी जुन्या गाण्यांवर आधारित एक तासाचा कार्यक्रम बनवून घेऊन यायला सांगितलं. स्टेशनवर म्युझिक कलेक्शन भरपूर असलं तरी त्यात भारतीय संगीत खूपच कमी होतं. त्यामुळं आम्हालाच जवळच्या सीडीज किंवा इंटरनेटवरून डाऊनलोड केलेली गाणी बरोबर घेऊन जायला लागायचं.

पहिल्यांदा 'ऑन एअर' जाताना थोडी धाकधूक होती, पण आम्ही दोघे असल्यामुळं काही अडचण आली नाही. दोन तासांच्या प्रोग्रॅममध्ये पहिला तास नवी आणि दुसरा तास जुनी गाणी असा सर्वसाधारण फॉर्मॅट होता. दर दोनतीन गाण्यांनंतर त्या गाण्यांबद्दलची माहिती, एखादा गंमतीशीर किस्सा,

काही स्थानिक घडामोडींची माहिती सांगायचो. आधी मला वाटलं होतं की आमचा कार्यक्रम फक्त भारतीय लोकच ऐकत असतील. पण बरेच अमेरिकन आणि लेक्झिंग्टनमध्ये राहणारे बाकीच्या देशांचे लोकपण आवर्जून कार्यक्रम ऐकायचे आणि तसं फोन करून कळवायचे पण. पूर्ण इंग्रजीत बोलावं, तर एखादा भारतीय फोन करून तक्रार करायचा की 'म्युझिक फ्रॉम इंडिया' तुम्ही इंग्रजीमध्ये कसं सादर करता. याउलट पूर्ण हिंदीत बोलावं, तर अमेरिकन लोकांचे फोन यायचे की आत्ताचं गाणं कुठल्या अल्बममधलं होतं, ते आम्हाला पुन्हा कुठे ऐकता येईल. त्यामुळं एकच माहिती दोन भाषांत द्यावी लागे. एकट्यानं कार्यक्रम करायला सुरुवात केली आणि हळूहळू त्याचं रुटीन अंगात भिनत गेलं. रात्रीचा कार्यक्रम असल्यामुळं आधीचा डीजे निघून गेला की संपूर्ण स्टेशनमध्ये कोणीच नसायचं. आपण एकटेच एका बंद खोलीत बसून माईकमध्ये बोलतोय, गाणी लावतोय, आणि लेक्झिंग्टन आणि कुठले–कुठले अज्ञात लोक ते ऐकतायत, याची गंमत वाटायची. आठवडाभर रिकाम्या वेळात सारखे कोणती थीम घ्यायची, कोणती गाणी ऐकवायची, कुठले किस्से सांगायचे याचेच विचार घोळत असायचे. नेहमीच्या 'बॉलिवूड' गीतांबरोबर मराठी गाणी, शास्त्रीय संगीत, गझल्स, लोकगीतं, इंडियन फ्यूजन म्युझिक वगैरेसुद्धा मुद्दाम लावायचो. या सगळ्या प्रकारात भारतीय संगीताबद्दलच्या माझ्या एकूण ज्ञानात चांगलीच भर पडली. इंटरनेटवर चाहत्यांनी खूप परिश्रम घेवून जमवलेले जुन्या दुर्मिळ गीतांचे खजिने गवसले, आणि चांगल्या संगीताचा, मग ते कितीही जुनं का असेना, कधीही लोप होणार नाही याची खात्री पटली. भारतीय संगीत आणि पाश्चात्य संगीत यांचा एकमेकांवर कसा प्रभाव पडलाय याची बरीच उदाहरणं बघायला मिळाली. आठवडाभर वेचून जमवलेली गाणी, त्यांच्या अनुषंगानं सांगायचे किस्से, गुरुवारी संध्याकाळी स्टेशनवर कॉफीचा मोठ्ठा कप घेवून पोचणं,आधीच्या डीजेशी थोड्या गप्पागोष्टी, दोन तासांचा कार्यक्रम, अध्येमध्ये घणघणणारे श्रोत्यांचे फोन....दहा वाजता हे सगळं संपलं की घरी परतताना एकदम रितं रितं वाटायचं. मग पुढच्या आठवड्याच्या कार्यक्रमाची तयारी...

कार्यक्रम करताना बऱ्याच गमतीजमती पण व्हायच्या. जाहिराती हा प्रकार जरी

नसला तरी स्थानिक उद्योगांचे मालक आपल्या उद्योगाची ३० सेकंदांची माहिती रेकॉर्ड करून वाजवण्यासाठी पैसे देऊ शकायचे. त्याला स्टेशनच्या परिभाषेत 'ग्रँट' असं नाव होतं आणि एका तासाला एक ग्रँट वाजवणं प्रत्येक डीजेवर बंधनकारक होतं. या ग्रँटमध्ये त्या उद्योगाची माहिती असे, पण श्रोत्यांना 'तुम्ही अमुक करा' असं आवाहन नसे. लेक्झिंग्टनमध्ये 'ताज इंडिया' नावाचं नवीन रेस्टॉरंट निघालं होतं (बाकी इथं इंडियन रेस्टॉरंटना नावं देताना इतकं कल्पनादारिद्र्य का दाखवतात कोण जाणे! प्रत्येक शहरात 'ताज', 'तंदूर', 'बॉबे', 'दिल्ली' या नावाची रेस्टॉरंटस हटकून असतातच. मी आधी ज्या शहरात होतो तिथे एका पुणेकर मराठी माणसानं 'कर्मा' नावाचं रेस्टॉरंट उघडल्याचा अद्भुत चमत्कार घडला होता. पण तिथलं जेवण अगदीच बेचव असायचं. तो मालकच बरेचदा शेजारच्याच 'बर्गर किंग' मध्ये खाताना दिसायला लागला आणि त्याच्या कर्माची फळं म्हणून ते रेस्टॉरंट बंद झालं!) तर या 'ताज इंडिया' च्या मालकाला अशी एक ग्रँट बनवायची होती. मी चौकशी करून त्याला सांगितलं की २०० डॉलर्समध्ये त्याला ग्रँट बनवता येईल आणि ती दररोज कमीत कमी चारपाच वेळा वाजवली जाईल. वास्तविक हा दर इतर स्टेशन्सच्या मानानं दसपट स्वस्त होता. पण त्यानं माझ्यामागं टुमणं लावलं की काही करून १५० डॉलर्समध्ये मला 'डील' करून दे. मी त्याला म्हणलं की मी व्हॉलंटियर डीजे आहे, तू ग्रँटस मॅनेजरशी बोल. त्याला तो तयार नव्हता. 'आप कभीभी आओ, मुफ़्तमे खाना खिलाऊंगा, लेकीन पूरा बिझिनेस मुझेही मिलना चाहिये ऐसा कुछ करो' अशी खुल्ली ऑफर त्यानं मला दिली. मी मनात म्हटलं की मला जर हे माहित असतं तर स्वत:चाच बिझनेस नसता का चालू केला मी! त्याच्या मुलाचा वाढदिवस होता तेव्हा त्याचा फोन आला, " आप अपना म्युझिक इक्विपमेंट और कुछ पंजाबी सीडीज लेके म्युझिक बजानेके लिये घरपे आओ." बहुतेक मी त्याला व्यावसायिक डीजे वाटलो होतो. वाटलं की चला, उद्या मंदीचा फटका बसून नोकरी गेली तर एक पर्यायी करिअर हाताशी आहे! एकदा एका नुकताच प्रेमभंग झालेल्या तरुणानं आपल्या बेवफा प्रियतमेला एक आर्त गाणं 'डेडिकेट' केलं तर तिचा चवताळून स्टेशनवर फोन आला की माझं नाव घेऊन तुम्ही हे असलं गाणं वाजवलंच कसं? तेव्हापासून श्रोत्यांची पसंद जरा

काळजीपूर्वकच वाजवायला लागलो. एकदा एक विद्यार्थी डीजे रात्री ३ ते ६ चा शो करायला आला आणि ३ तासांची सीडी लावून झोपून गेला! हे पण ठीक होतं, पण तो ती सीडी 'ऑन एअर' टाकायला विसरला आणि श्रोत्यांना बराच वेळ चक्क त्याचं घोरणं ऐकावं लागलं! त्या रात्री बिचाऱ्या स्टेशन डायरेक्टरची झोप उडाली होती! महिन्याच्या पहिल्या रविवारी सगळ्या स्टाफची मीटिंग असे, तेव्हा पिझ्झावर ताव मारता–मारता या गोष्टींवर हसत–खेळत चर्चा होई. पण नेहमी चेष्टामस्करी करणारे हे विद्यार्थी स्टेशनचा ट्रान्समिटर बदलायचा होता तेव्हा इंजिनियरच्या जोडीनं रात्ररात्र जागून कामपण करत होते....

सध्या मी आणि वीणाजी आलटून–पालटून कार्यक्रम करतो. स्टेशनवरचे बरेच डीजे चांगले मित्र झालेत. उन्हाळ्यात सगळ्यांची एक टेनिस टूर्नामेंट आहे, त्याचीपण प्रॅक्टिस लवकरच चालू होईल. लेक्झिंग्टनमधल्या भारतीय समाजातले बरेचसे लोकसुद्धा ओळखायला लागलेत. या नव्या शहरात वाटणारा एकटेपणा आता खूप कमी झालाय. काहीवेळा वाटतं की या परक्या देशात लोकांना आठवड्यातून एकदा आपल्या पसंतीचं भारतीय संगीत ऐकवण्यासारखं साधंसोपं काम करून इतकं समाधान मिळत असेल, तर वर्षानुवर्षे आपल्या कलेनं जगभरातल्या लोकांना तृप्त करणाऱ्या कलाकारांचं काय? संगीत, कला, क्रीडा ही धर्म, वर्ण, भाषा, संस्कृती यांची बंधनं पार करून लोकांना एकत्र आणणारी किती प्रभावी साधनं आहेत! माझे वडील नेहमी एक उदाहरण देतात– 'मन तडपत हरी दर्शन को आज' हे विष्णूचं भजन लिहिलं होतं शकील बदायुनींनी, त्याला संगीत होतं नौशादचं आणि ते गायलं होतं महंमद रफी यांनी! शेवटी एकात्मता म्हणजे तरी वेगळं काय असतं? 'बसंत बहार' चित्रपटात मन्ना डे गाऊन गेलाय तेच खरं– स्वर की साधना परमेश्वर की साधना!